**National Journal of Geography** {Impact Factor 1.906 (IIFS)}
**Maharashtra Bhugolshastra Sanshodhan Patrika**
Vol. XXXI, No.2, Jul-Dec. 2014, pp 20-27
ISSN : 0971-6785

# GEOGRAPHICAL ANALYSIS OF PLACE NAMES OF SETTLEMENTS IN ASNA BASIN

B. N. Pastapure Balaji Avhad

***Abstract***

*In the ancient time rural settlement located as various place. Rural settlement name related to the relief, Animal, Vegetation, God and local incident. In Asna basin 48% rural settlements Suffix and Preefix, Pur and Wadi. 259 settlements in the study area 45% settlement name related to the vegetation also Valley, Confluence and river basin, plateau and natural environment 9 Sub-basin Settlement name distribution the special settlement.*

***Keywords:*** *Suffix, Prefix, Cultural and Natural factor.*

# आसना खोऱ्यातील वस्तीस्थंळाच्या नावाचे भौगोलिक विष्लेशण

**प्रस्तावनाः**

मानवी भूगोलातील घटकाशी वस्तींची नावे संबंधित आहेत. वस्तीच्या नावाचे विश्लेषण करण्यासाठी तेथील भाषेचे ज्ञान असणे महत्वाचे असते (कनकूरे व इतर, २०१०). वसाहतीच्या नावावरुन तेथील पर्यावरणीय परीस्थितीचे ज्ञान प्राप्त होऊन उत्पतीचा कालावधी समजतो २०१२). सर्वसाधारणपणे वस्तीच्या नावामध्ये दोन पदे मुख्यतः आढळून येतात. त्याामध्ये अद्यपद व अंत्यपद यांच्या विश्लेषणावरुन वस्तीचा भूतकाळाशी संबंधित संबंध स्पष्ट होत असतो व त्यातून पर्यावरणीय परिस्थिती अवगत होते नैसर्गिक व सांस्कृतिक घटकावर आधारीत वस्त्यांची नावे त्यामध्ये जलप्रवाह, भूरुप, वनस्पती, प्राणी, देवता, रस्ते इत्यादी वरुन ग्रामीण वस्त्यांची नावे रुढ झाली आहेत (कनकूरे व इतर, २०११ आणि १९८१). यावरुन प्रस्तूत षोधनिंबधातील ग्रामीणवस्त्यांची नावांचा अभ्यास केला असता आसना खोऱ्यातील उपखोऱ्यातील वस्त्यांच्या नावाचे विश्लेषण केले आहे. त्यामध्ये गावअंत्यपद असणाऱ्या २५ प्रतिषत, पूर अंत्यपद असणाऱ्या१३.६४ प्रतिषत व वाडी अंत्यपद असणाऱ्या वस्त्या १० प्रतिषत ऐवढ्या आहेत. यावरुन आसना खोऱ्यातील ग्रामीण वस्तीच्या भौगोलिक विश्लेषणावरुन वस्तींच्या उत्क्रांतीविशवी माहीती मिळण्यास मदत होते.

**उद्दिष्ट्येः**

१. आसना खोऱ्यातील ग्रामीण वस्तीच्या नावाचा व वितरणाचा अभ्यास करणे.
२. ग्रामीण वस्तीच्या नावातील अंत्यपदाचे विष्लेशन करणे.
३. आसना खोऱ्यातील भौगोलिक व सांस्कृतिक घटकांचा ग्रामीण वस्तीच्या नावावर झालेला प्रभाव अभ्यासणे.

**माहिती संकलन व संशोधन पध्द्तीः**

प्रस्तुत अभ्यासासाठी द्वितीय स्वरुपाच्या आकडेवारीचा आधार घेतलेला आहे. आसना खोऱ्यातील ग्रामीण वस्ती घटक गृहीत धरुन अभ्यासासाठी जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, हिंगोली व नांदेड जिल्हा जनगणना अहवाल(२००१) यातून संकलित केलेल्या आकडेवारीचा वापर केलेला आहे. आसना खोऱ्यातील ग्रामीण वस्तीच्या नावाचे आद्यपद व अंत्यपदाचे वितरण दर्शविण्यात आलेले आहे.

**अभ्यासक्षेत्रः**

प्रस्तुत संशोधनासाठीआसना खोरे हे अभ्यास क्षेत्र म्हणून निवडले आहे.अभ्याास क्षेत्राचा अक्षवृत्तीय विस्तार १९ॅ१०'४५'' ते १९ॅ३१'५७'' उत्तर व रेखावृत्तीय विस्तार ७७ॅ४६'३४'' ते ७७ॅ३०'२२''पूर्वऐवढा आहे. आसना नदीच्या उघडी, लोणारी, कुरुंदा व टोर या उपनद्या आहेत. सदरील अभ्यास क्षेत्रात २५९ वसाहती असून त्यामध्ये ६९१६४९ इतकी लोकसंख्या सामावली आहे. आसना खोऱ्याचे स्थान दख्खनच्या पठाराचा एकभाग असून तो अंजठा डोंगररांगाखाली येतो. सरासरी तापमान ४३ॅ ते ११ॅच्या दरम्यान असून वार्षिक सरासरी पर्जन्य ८९३ मी.मी. आहे. आसना खोऱ्याचे क्षेत्रफळ १०८८.९० चौ.कि.मी. तसेच खोऱ्याची लांबी ३४.५३ कि.मी. असून समुद्रसपाटीपासूनची उंची ५४८ ते ३६० मी. दरम्यान असून मुख्य नदी प्रवाहाची लांबी ५९.०५ कि.मी. इतकी आहे.

**विषय विवेचनः**

अभ्यास क्षेत्रातील ग्रामीण वसाहतीच्या नावाचे भौगोलिक विष्लेशण केले असता त्यांची नावे प्रादेशिक भाषा, दंतकथा, पौराणीक कथा, पर्यावरण, सांस्कृतिक घटक यावरुन पडल्याचे आढळून आले आहे. ग्रामीण वस्तीच्या नावाचा उल्लेख करत असतांना नैसर्गिक, सांस्कृतिक व भौगोलिक वैशिष्ट्यांचा उपयोग होतो. वस्तींच्या उपयोग वस्तींच्या नावाचा अर्थ स्पष्ट करण्यासाठी क्षेत्राशी संबंधित पूर्वीच्या मानवाच्या ठरावीक सवयी आणि त्यांच्या अगोदरच्या व नंतरच्या गटाशी असलेले संबंध आधारभूत ठरतात. वस्तीच्या नावाचे अंत्यपद नगर, शहर, ग्राम, खेडे, पूर व वसाहत इ.पद संस्कृतमधुन तर मुस्लीम राजवटीतील वस्त्यांच्या नावांचे अंत्यपदडी, ली,अली हे शब्द पाली नावापासून निर्माण झालेले आहे. पाली म्हणजे टेकडी होय.

**उपखोऱ्यानुसार वस्तीच्या नावांचे वितरण आणि विश्लेषण:**

आसना खोऱ्यातील वेगवेगळ्या अंत्यपदापासून तयार झालेल्या एकून २५९ वसाहतीपैकी २२० वस्त्यांच्या नावाचे अंत्यपद गाव, पूर, वाडी, ली आणि अली, डी, नी, ती, श्वर आणि अर, री, वडा, आणि वाडा अज, वालन आणि गव्हान, की, नगर, तांडा, बुजूर्ग, खूर्द, ला, बा, ता आणि ठा व बन असे असून त्यांचे वितरण आणि टक्केवारी तक्ता क्र. १ मध्ये दर्शविली आहे.


**तक्ता क्र. १ः आसना खोऱ्यातील ग्रामीण वस्तींच्या नावाचे वितरण व टक्केवारी**

| अ. क. | अंत्यपद /उपखोरे | उपखोरे 1 | उपखोरे 2 | उपखोरे 3 | उपखोरे 4 | उपखोरे 5 | उपखोरे 6 | उपखोरे 7 | उपखोरे 8 | उपखोरे 9 | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | गाव | 1 | 8 | 13 | 6 | 10 | 6 | 1 | 2 | 8 | 55 | 25.00 |
| 2 | पूर | 1 | 8 | 4 | 4 | 4 | 2 | 1 | 3 | 3 | 30 | 13.64 |
| 3 | वाडी | 2 | 10 | 6 | 0 | 0 | 0 | 3 | 1 | 0 | 22 | 10.00 |
| 4 | ली आणि अली | 1 | 0 | 1 | 2 | 2 | 0 | 1 | 0 | 3 | 10 | 4.55 |
| 5 | डी | 0 | 0 | 2 | 0 | 1 | 3 | 0 | 1 | 1 | 10 | 3.64 |
| 6 | नी | 0 | 2 | 0 | 3 | 1 | 0 | 0 | 2 | 1 | 8 | 4.09 |
| 7 | टी | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0.45 |
| 8 | ष्वर आणि अर | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 2 | 0.91 |
| 9 | वडा आणि वाडा | 1 | 1 | 1 | 0 | 3 | 1 | 0 | 0 | 1 | 2 | 0.91 |
| 10 | अज | 2 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0.00 |
| 11 | वालन व गव्हान | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0.45 |
| 12 | की | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 0.91 |
| 13 | नगर | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 1 | 2 | 0.91 |
| 14 | तांडा | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 1 | 5 | 2.27 |
| 15 | बुजूर्ग | 0 | 1 | 3 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 18 | 8.18 |
| 16 | खूर्द | 1 | 3 | 2 | 1 | 3 | 2 | 1 | 0 | 5 | 14 | 6.36 |
| 17 | ळा व ला | 0 | 1 | 2 | 1 | 3 | 2 | 0 | 2 | 3 | 17 | 7.73 |
| 18 | बा | 4 | 1 | 2 | 1 | 3 | 1 | 2 | 2 | 1 | 4 | 1.82 |
| 19 | टा व ठा | 1 | 0 | 2 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 8 | 3.64 |
| 20 | बन | 1 | 0 | 3 | 1 | 0 | 0 | 1 | 2 | 0 | 2 | 0.91 |
| 21 | री | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 0 | 0 | 0 | 0 | 8 | 0.91 |
| | एकूण | 15 | 35 | 42 | 21 | 34 | 19 | 10 | 16 | 28 | 220 | 100 |

**(स्त्रोतः हिंगोली जिल्हा जनगणना अहवाल २०११)**


गाव हे अंत्यपद असलेल्या वस्तींची संख्या ५५ इतकी सर्वाधिक व त्यांची टक्केवारी २५ प्रतिशत आहे. उपखोरे ३ मध्ये १३ वस्त्या या अंत्यपदाच्या आहेत. त्याखालोखाल उपखोरे ५ मध्ये १० वस्त्या, उपखोरे ९ मध्ये ८ वस्त्या, उपखोरे ४व ६ मध्ये ६ वस्त्या, गाव या अंत्यपदाच्या आहेत.

आकृती क्र.१ः आसना खोऱ्यातील वस्तींच्या नावाशी संबंधित आद्यपद आणि अंत्यपद




उपखोरे ३ मध्ये भेंडेगाव,धामनगाव,हिरडगाव,इंजनगाव इ. तर उपखोरे मध्ये आसेगाव, पळसगाव, सावरगाव, टाकळगाव इत्यादी. उपखोरे २ व ९ मध्ये बारसगाव, आंबेगाव, मालेगाव, पासदगाव व उपखोरे ४ व ६ मध्ये इत्यादी ग्रामीण वसाहतीच्या नावाचे अंत्यपदगाव आहे तर पूर हे अंत्यपद असणाऱ्या वस्तीच्या नावांची संख्या आसना खोऱ्यामध्ये ३० असून त्याचे प्रमाण १३.६४ प्रतिशत एवढे आहे.

आकृती क्र.२ः आसना खोऱ्यातील वस्तींच्या नावाशी संबंधित आद्यपद आणि अंत्यपद



पूर हे अंत्यपद असलेल्या वस्त्यांची सर्वाधिक संख्या उपखोरे २ मध्ये असून ती ८ एवढी आहे. त्याखालोखाल उपखोरे ३, ४, व ५ मध्ये ४, उपखोरे ८ व ९ मध्ये ३ आणि उपखोरे १ आणि ७ मध्ये १ एवढी आहेत (तक्ता.क्र.१). उदा. शहापूर,लतीफपूर.तर वाडी हे अंत्यपद असलेल्या ग्रामीण वस्तीच्या नावाची संख्या अभ्यास क्षेत्रात २२ असून त्याचे १० प्रतिशत ऐवढे प्रमाण आहे. उपखोरे २ मध्ये १०, उपखोरे ३ मध्ये ६ व उपखोरे ७ मध्ये ३ तर उपखोरे ८ मध्ये सर्वात कमी आहे. उदा. बोगारवाडी डाक्याचीवाडी, निलकंठवाडी(नकाशा क्र.२).बुजर्ग हे अंत्यपद असलेल्या वस्तीच्या नावाची संख्या आसना खोऱ्यात १८ ऐवढी असून त्याचे प्रमान ८.१८ एवढे आहे. उपखोऱ्यानुसार वितरण पाहत असतांना उपखोरे ९ ची सर्वाधिक संख्या असून ५ ऐवढी आहे. तर उपखोरे २ व ५ ती ३ उपखोरे ३ आणि ६ मध्ये २ ऐवढी आहे. ला हे अंत्यपद असलेल्या वस्तीच्या नावाची संख्या १७ असून त्याची टक्केवारी ७.७३ आहे. तर उपखोरे ५ मध्ये ३, उपखोरे ३,७ व ८ मध्ये २ आहे. खूर्द हे अंत्यपद असलेल्या वस्तीच्या नावांची संख्या १४ असून त्याचे प्रमाण १४ प्रतिशत आहे. व ली आणि अली अंत्यपद असणाऱ्या वस्तीच्या नावांची संख्या १० असून त्याचे प्रमाण ४.५५ प्रतिशत आहे. यावरुन असे लक्षात येते की अभ्यास क्षेत्रातील ग्रामीण वस्तीच्या नावाचे अंत्यपद त्या वस्तीचे ठिकाण व स्थिती याचा प्रभाव अंत्यपदावर झाल्याचे दिसून येते.

**नैसर्गिक पर्यावरणाशी संबंधित ग्रामीण वसाहतीची नावेः**


बहूसंख्य ग्रामीण वसाहतीच्या नावाचे सुरवातीचे पद व अंत्यपद हे नैसर्गिक घटकांशी संबंधित आहेत. कारण वसाहतीची निर्मिती ही नदयांच्या खोऱ्यात आणि निसर्ग सान्निध्यात झालेली आहे. म्हणून नदी,तलाव, प्राणी, वनस्पती, भूरुपे, उतार इ. भौगोलिक घटकांशी संबंधित ठिकानावरुन वसाहतीची नावे पडलेली आहेत. आसना खोऱ्यातील एकून ग्रामीण वस्तीपैकी ६९ वस्तीची नावे नैसर्गिक पर्यावरणाशी संबंधित आहेत. या ६९ वस्तीच्या नावापैकी ४५ ग्रामीण वस्तीची नावे वनस्पतीशी संबंधित आहेत. कारण हे क्षेत्र नदी खोऱ्याचे आहे, त्यामूळे झाडांची संख्या तूलनेने अधिक आहे त्यावरुन वस्तीला नाव देण्यात आले आहेत. उपखोरे ३ मध्ये ११, उपखोरे ५ मध्ये १०, उपखोरे २ मध्ये ७ व उपखोरे १ मध्ये ४, तर उपखोरे ७ व ८ मध्ये ३ ऐवढया वस्त्यांची नावे वनस्पतीशी संबंधित आहेत. उदा. बोराळा, पळसगाव, बोरगाव, आंबा, बाभूळगाव, दगडगाव, खैरगाव, पिंपराळा, एकदरा, जांभळ सावली, हिवरा, निमगांव, धामदरी, इ. ग्रामीण वसाहतीची नावे वनस्पतीशी संबंधित आहेत. अभ्यास क्षेत्रामध्ये ९ वस्तीची नावे प्राण्यांची संबंधित असून त्यामध्ये उपखोरे २,७ आणि ९ मध्ये प्रत्येकी २ व उपखोरे ३,४मध्ये प्रत्येकी १ वस्तीचे नाव प्राण्यांशी संबंधित आहे. जसे परवा, शहापूर, वाघी, चिमेगाव, धामनगाव, इ. नावे प्राण्यांषी संबंधित आहेत. भूरुपांशी संबंधित वस्त्या ८ आहेत. त्यामध्ये डोणवाडा, धामदरी, दगडगाव, मळवटा, दगडपिंपरी इ. त्याचप्रमाणे प्राणी व प्रवाहाशी संबंधित नावांमध्ये ७ वस्त्यांचा समावश आहे. जसे रांजोना. व हपसापूर (तक्ता.क्र.२).

**सांस्कृतिक पर्यावरणाशी संबंधित ग्रामीण वस्त्यांची नावेः**

नैसर्गिक घटकाप्रमाणे सांस्कृतिक पर्यावरणांच्या प्रभावामुळे ग्रामीण वस्त्यांची उत्क्रांती होते. सांस्कृतिक

पर्यावरणाच्या प्रभावामुळे ग्रामीण वस्तीच्या नावांवर संस्कृती, समाज, धर्म, व्यक्ति, व राजकारण यांचा प्रभाव पडलेला दिसुन येतो. अभ्यास क्षेत्रातील ८३ ग्रामीण वसाहतीची नावे सांस्कृतीक घटकांशी संबंधित असून त्यापैकी ६० नावे व्यक्तीच्या नावांशी संबंधित आहेत.

**आकृती क्र.३: आसना खोऱ्यातील वस्तींच्या नावाशी संबंधित आद्यपद आणि अंत्यपद**




**तक्ता क्र. २: उपखोऱ्यानुसार आसना खोऱ्यातील नैसर्गिक आणि सांस्कृतिक घटकाशी संबंधित वस्तींच्या नावाचे वितरण**

| अ. क. | उपखोरे | वनस्पती | प्राणी | जलप्रवाह | भूरुपे | देवता | जात | वैयक्तीक | एकून | टककेवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | उपखोरे 1 | 4 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 5 | 3.29 |
| 2 | उपखोरे 2 | 7 | 2 | 1 | 0 | 5 | 0 | 17 | 32 | 21.05 |
| 3 | उपखोरे 3 | 11 | 1 | 1 | 0 | 5 | 0 | 11 | 29 | 19.08 |
| 4 | उपखोरे 4 | 5 | 1 | 2 | 3 | 2 | 0 | 3 | 16 | 10.53 |
| 5 | उपखोरे 5 | 10 | 0 | 2 | 2 | 1 | 0 | 7 | 22 | 14.47 |
| 6 | उपखोरे 6 | 2 | 1 | 0 | 0 | 2 | 1 | 5 | 11 | 7.24 |
| 7 | उपखोरे 7 | 3 | 2 | 1 | 1 | 1 | 0 | 5 | 13 | 8.55 |
| 8 | उपखोरे 8 | 3 | 0 | 0 | 0 | 2 | 1 | 6 | 12 | 7.89 |
| 9 | उपखोरे 9 | 0 | 2 | 0 | 2 | 1 | 1 | 6 | 12 | 7.89 |
| | एकून | 45 | 9 | 7 | 8 | 19 | 4 | 60 | 152 | 100 |

(स्त्रोतः हिंगोली जिल्हा जनगणना अहवाल २०११)

जसे म्हातारगाव, राजावाडी, सारंगवाडी, लक्ष्मणतांडा, संगनाईकतांडा, शहापूर, वाडीजानजी, डाक्याचीवाडी, निलकंठवाडी, गोविंदपुर, राजापुर, पिंपरीमहीपाल, रामेश्वरतांडा, इत्यादी नावे व्यक्तीच्या नावावरुन, पद व पदव्यावरुन पडलेली आहेत. १९ ग्रामीण वस्त्यांची नावे देवदेवता यांच्याशी संबंधित आहेत. गणेशपूर, रामश्वर, निलकंठवाडी, पिंपळगाव महादेव, गोविंदपुर, इत्यादी ग्रामीण वस्त्यांची नावे आहेत. त्याचप्रमाणे ४ ग्रामीण वस्त्याची नावे जात या घटकांशी संबंधित असून त्यामध्ये खापरखेडा, जवळा पांचाळ, बामणी, कासारखेडा, यांचा समावेश होतो.

**आकृती क्र.४: आसना खोऱ्यातील वस्तींच्या नावाशी संबंधित सांस्कृतिक घटक**




निजामराजवटीतील धर्माच्या प्रसारामूळे आसना खोऱ्यातील वसाहतींच्या नावावर प्रभाव पडलेला आहे. जसे शहापूर, रहीमपूर, लतीफपुर, खाजमपूर, अहेमदपूर, वाहेदपूर, इसामपूर, निजामपुर, हरीदापुर, इत्यादी मुस्लीम धर्माशी संबंधित वस्त्यांची नावे आहेत.

**निष्कर्ष:**

ग्रामीण वस्त्यांच्या भौगोलिक विष्लेशणावरुन असे स्पष्ट होते की, वस्त्यांच्या नावांवर नैसर्गिक व सांस्कृतिक पर्यावरणाचा परीणाम होतो. वस्तीच्या नावांवरुन त्यांची उत्क्रांती व भूतकाळातील संदर्भ उलगडतांना दिसतात. आसना खोऱ्यातील बहूतेक वस्त्यांची नावे वनस्पती, देवदेवता व वैयक्तिक स्वरुपाची आहेत. यामध्ये ४५ वस्त्यांची नावे वनस्पतीशी संबंधित आहे. तर २५ प्रतिशत ग्रामीण वस्त्यांची नावांचे अंत्यपद गाव आहे. व त्याखालोखाल १३.६४ प्रतिशत वस्तीच्या नावाचे अंत्यपद पूर आहे.

त्याचप्रमाणे ८३ ग्रामीण वस्तीची नावे सांस्कृतिक घटकांशी संबंधित आहते. त्यापैकी ६० ग्रामीण

वस्तीची नावे देवदेवतांशी संबंधित आहेत, यावरुन ग्रामीण वस्तीच्या नावांच्या अभ्यासावरुन वस्त्यांची उत्क्रांती भौगोलिक व सांस्कृतिक वैशिष्ट्ये समजण्यास मदत होते.

**संदर्भः**


१. लंवाडे, एस.एम. व चौधरी, षं. रा. (२००३):पूर्णा खोऱ्यातील ग्रामीण वस्त्यांची उत्क्रांती, म.भू.प. पुणे, खंड, अंक १, जानेवारी–जून, २००३ पृष्ठ १–१०

२. कनकूरे, के.बी., कळसकर, एस.एन आणि पस्तापूरे, बी.एन.(२०१०): परभणी जिल्हयातील ग्रामीण वस्तीच्या नावाचे भौगोलीक विश्लेषण, Research Link, Vol.VIII, Issue.II, Mar-Aug. 2011, PP.75-78.

३. कनकूरे, के. बी., पस्तापुरे, बी.एन.आणि धनुष्वर आर.(२०११): नांदेड जिल्हयातील ग्रामीण वस्तीस्थळांच्या नावांच्या वितरणाचा भौगोलिक अभ्यास Universal Research Analysis Vol. Issue. II Mar-Aug 2011 PP 159–163.

4. Census of India (2011) District Census Hand Book Hingoli and Nanded District.

5. Jadhav J.A. and Kulkarni, S.P. (2012): Spatial analysis of Place Names of Ahmadnagar district of Maharashtra : Geographical analysis, M.B.P. Pune, July-Dec. 2012, Vol. XXIX (2), PP. 95-103

6. Kumbhar, A.P. (1997): A Study of Rural settlements in Nira Valley, Sumeroo Pakasham, Thane, Aug. 1991, PP. 19-36

7. Savita, Anand (1981): Place Names of the rural settlements of the outer Himalaya a Geographical interpretation, Trans. Inst. Indian Geographer, Vol.3, No.1, Jan.1981, PP.53-63.

8. Socio-Economic Review (2012): and District Statistical Abstracts, Hingoli and Nanded District-



*** प्रा. डॉ. बी. एन. पस्तापूरे**
सहाय्यक प्राध्यापक, भूगोल विभाग,
इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालय,
सिडको, नांदेड

**** बालाजी आव्हाड**
संशोधक विद्यार्थी
भूगोल विभाग, महाराष्ट्र उदयगीरी महाविद्यालय,
उदगीर जि. लातूर